मंगळवार, दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीच्या कार्यवृत्तातील आपल्या विभागाशी संबंधित निर्णयाचा उतारा :-

<u>गुप्त</u>

मुख्य सचिवांचे कार्यालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ८ एप्रिल, २०२५.

शासनाचे अपर मुख्य सचिव (गृह) / अपर मुख्य सचिव (खनिकर्म)/ अपर मुख्य सचिव (गृह /परिवहन) / अपर मुख्य सचिव (जलसंपदा) / अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) / अपर मुख्य सचिव (नगर विकास-१) / सचिव (अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांना महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम १५ अन्वये देण्यात आलेल्या शासनाच्या कामकाजासंबंधी अनुदेशामधील अनुदेश २७ (३) अन्वये योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

विभागाने सदर निर्णयाची **अंमलबजावणी तातडीने** करावी व तत्संबंधीची माहिती मंत्रिमंडळास देण्याकरिता विहित केलेल्या प्रपत्रात ई-समिक्षा प्रणालीवर सादर करावी. यामध्ये कोणतीही अडचण असल्यास प्रकरण शासनास त्वरित फेरसादर करावे.

**मंत्रिमंडळ सचिव**

<u>प्रत (संपूर्ण कार्यवृत्ताच्या प्रतीसह)</u> :-

१) अपर मुख्य सचिव (वित्त)
२) अपर मुख्य सचिव (नियोजन)

मंत्रिमंडळ बैठकीचा दिनांक : ०१.०४.२०२५

विषय क्रमांक ५ : **नोंदणीकृत वाहन निष्कासन केंद्रामध्ये स्वेच्छेने निष्कासित केलेल्या वाहनांच्या अनुषंगाने सुधारित कर सवलत लागू करण्याबाबत.**

या विषयावरील विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाने चर्चा केली आणि खालीलप्रमाणे निर्णय घेतले.

१. केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५१ (क) मध्ये विहित केल्यानूसार निष्कासित वाहनाच्या बदली नोंदणी होणाऱ्या नवीन वाहनास मोटार वाहन करातून पुढीलप्रमाणे सूट देण्यात यावी.

| वाहनाचा प्रकार | कर सवलत |
|---|---|
| परिवहन संवर्गातील स्वेच्छेने स्क्रॅप केलेले वाहन | १. ज्या वाहनांना एकरकमी कर लागू आहे असे वाहन ज्या वर्षात नोंदणी केले जाईल अशा नव्याने नोंदणी होणाऱ्या वाहनांच्या एकरकमी कराच्या १५ टक्के.<br>२. ज्या वाहनांना वार्षिक कर लागू आहे अशा वाहनाच्या नोंदणी दिनांकापासून पुढील ८ वर्षांपर्यंत वार्षिक कराच्या १५ टक्के. |
| परिवहनेत्तर संवर्गातील स्वेच्छेने स्क्रॅप केलेले वाहन | १. ज्या वाहनांना एकरकमी कर लागू आहे असे वाहन ज्या वर्षात नोंदणी केले जाईल अशा नव्याने नोंदणी होणाऱ्या वाहनांच्या एकरकमी कराच्या १५ टक्के.<br>२. ज्या वाहनांना वार्षिक कर लागू आहे अशा वाहनाच्या नोंदणी दिनांकापासून पुढील १५ वर्षांपर्यंत वार्षिक कराच्या १५ टक्के. |

२. याबाबतची अधिसूचना जारी केल्यापासून तीन वर्षाच्या आत समान प्रकारच्या वाहनांचे (Similar category of vehicle) साठी जारी करण्यात आलेल्या ठेवींचे प्रमाणपत्र (Certificate of Deposite) सादर करणाऱ्या समान प्रकारच्या वाहनाच्या नवीन वाहनाच्या नोंदणीसाठी सदर सूट लागू राहील.

३. ठेवींच्या प्रमाणपत्राची (Certificate of Deposite) वैधता जारी केलेल्या दिनांकापासून पुढील दोन वर्षांपर्यंत असेल.

**कार्यवाही : अपर मुख्य सचिव (गृह /परिवहन)**

( विठ्ठल भास्कर )
अवर सचिव
मुख्य सचिव कार्यालय
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२